**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त देशभरातून अभिवादन.**
2. **विश्वासमोर यशस्वी उदाहरण सादर करण्यासाठी भारतानं स्वतःचा विकास मार्ग तयार करावा - संघाच्या शताब्दी कार्यक्रमात डॉ. मोहन भागवत यांचं प्रतिपादन.**
3. **६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दिक्षाभूमीवर अनुयायांचा जनसागर; थोड्याच वेळात मुख्य सोहळ्याला होणार प्रारंभ.**
4. **बिहारच्या बुद्धगया इथल्या महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्धांच्या हाती देण्याच्या मागणीसाठी मुंबईत 14 ऑक्टोबर रोजी सर्वपक्षीय विराट मोर्चाचं आयोजन.**
5. **विजया दशमी सणाचा सर्वत्र उत्साह, रावण दहनासह विविध कार्यक्रमांचं आयोजन.**

**आता सविस्तर बातम्या .......**

**गांधी, शास्त्री जयंती**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५६व्या जयंती निमित्त तसंच देशाचे दुसरे पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंती निमित्त देश त्यांना अभिवादन करीत आहे. नवी दिल्लीत राजघाट इथं, महात्मा गांधींच्या समाधीस्थळी, सर्वधर्म प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांसह, अनेक नेत्यांनी राजघाट इथं, पुष्पांजली अर्पण केली. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते, राहुल गांधी यांनीही, राष्ट्रपिता महात्मा गांधींना आदरांजली वाहिली आहे. नागपुर काँग्रेस कडून, व्हेरायटी चौक इथं गांधी पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. यावेळी माजी केंद्रीय मंत्री, विलास मुत्तेमवार, काँग्रेस शहर प्रमुख, विकास ठाकरे, यांच्यासह, कार्यकर्ते मोठ्या संख्येनं उपस्थित होते. आकाशवाणी नागपूरसह अनेक सरकारी आस्थापनांतून, महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांना, अभिवादन करण्यात आलं.

**संघ शताब्दी महोत्सव/भागवत**

देश, काल, परिस्थितीचा विचार करून, आपल्या समग्र आणि एकात्मक दृष्टिकोनातून, आपला स्वतःचा विकास मार्ग तयार करून, विश्वासमोर एक यशस्वी उदाहरण सादर करावं लागेल असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी केलं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या, शताब्दी विजयादशमी महोत्सवाला त्यांनी आज सकाळी संबोधित केलं. सर्वांगीण प्रगतीसाठी सगळ्यांना जोडणाऱ्या धर्माचा मार्ग अनुसरावा लागेल असं भागवत म्हणाले -

***(होल्ड बाईट -सरसंघचालक डॉ.मोहन भागवत -३१ सेकंद)***

***अर्थ और काम के पीछे अंधी होकर भाग रही दुनिया को धर्म की दृष्टि देनी पड़ेगी। वह धर्म में पूजा नहीं है, वर्शिप्स नहीं है, वो धर्म में खानपान, रीती, रिवाज नहीं है, वो धर्म इसके परे, सबको जोड़ने वाला, सबको उन्नत करने वाला, सबको साथ लेकर चलने वाला, प्रजा की सृष्टि की धारणा करने वाला धर्म है। उस धर्म का मार्ग हमको अपने उदाहरण से विश्व को देना पड़ेगा। भारतवर्ष को ऐसा होना ही पड़ेगा। ऐसे संघ मानता है, 100 साल के अनुभव के बाद।***

स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधींचं योगदान, अविस्मरणीय आहेच, परंतु स्वातंत्र्यानंतर भारत कसा असावा, भारतातील जीवन कुठल्या प्रकारच्या तंत्रानं चालावं, त्याबद्दल विचार ठेवणाऱ्या, त्या वेळच्या दार्शनीक नेत्यांपैकी गांधींजींचं स्थान अग्रणी असल्याचं प्रतिपादन, भागवत यांनी यावेळी केलं. यावेळी त्यांनी माजी

पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचं देखील स्मरण केलं. व्यक्तिगत आणि राष्ट्रीय चारित्र्य कसं असलं पाहिजे याचे आदर्श शास्त्री होते असं भागवत म्हणाले.

**संघ शताब्दी महोत्सव/कोविंद**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ.केशव हेडगेवार या दोन महापुरुषांमुळे नागपूरची भूमी माझ्यासाठी विशेष महत्त्वाची आहे असं प्रतिपादन, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी केलं. रेशीमबाग इथं आयोजित, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, शताब्दी महोत्सवाला ते मुख्य अतिथी म्हणून, संबोधित करत होते.

***बाबासाहेब अंबेडकर के संविधान में निहित सामाजिक न्याय की व्यवस्था के बल पर ही मेरी तरह आर्थिक और सामाजिक पृष्ठभूमि का एक सामान्य व्यक्ति देश के सर्वोच्च संवधानिक पद तक पहुँच सका। डॉक्टर हेडगेवार के गहन विचारों से समाज और राष्ट्र को समझने का मेरा दृष्टिकोण स्पष्ट हुआ।***

राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर, 1975 मध्ये बंदी आणली गेली. पण या आणीबाणीच्या काळात, संघानं भूमिगत चळवळ राबवून, एक प्रभावी प्रतिरोध उभा केला. आदर्श विचार, त्याग आणि धैर्यामुळ, संघ आज जगातली सगळ्यात मोठी स्वयंसेवकांची संस्था बनली आहे असं, कोविंद म्हणाले. २०४७ पर्यंत विकसित आणि एकात्म भारताच्या निर्मितीमध्ये संघाचं अमूल्य योगदान राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**दीक्षाभूमी- प्रवर्तन सोहळा**

६९वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आज नागपूरमध्ये साजरा होत आहे. लाखो बौद्ध अनुयायी पवित्र दीक्षाभूमीवर सकाळपासून अभिवादनासाठी येत आहेत. ऐकुया हा विशेष रिपोर्ट-

***(कॅप्सूल - राम औरंगाबादकर - १ मिनिट ३१ सेकंद)***

***(डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष, भदंत आर्य नागार्जुन सुराई ससाई यांच्या उपस्थितीत, आज सकाळी विशेष बुद्धवंदना आयोजित करण्यात आली. यावेळी समता सैनिक दलातर्फे, पंचशील ध्वज आणि, बाबासाहेबांना मानवंदना देत सलामी देण्यात आली. दरम्यान आज सायंकाळी दीक्षाभूमीवर संपन्न होत असलेल्या, मुख्य सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून, धम्म लर्निंग सेंटर सारनाथचे भदंत चंदीमा थेरो, बोधगया, महाविहार मुक्ती आंदोलनातील, भंते विनाचार्य, हरियाणा सरकारचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ.राजशेखर वुंद्रु उपस्थित आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यातून अनुयायी दीक्षा भूमीवर येत आहेत-***

***(होल्ड बाईट- अनुयायी)***

***मी संदीप कांबळे कोल्हापूरहून या ठिकाणी आलेलो आहे. आमच्यासोबत दरवर्षी धम्मदीक्षा प्रवर्तन सोहळ्यासाठी 50 एक लोक आपण घेऊन येत असतो आणि या दीक्षाभूमीवरचे पर्व आहे. तो या ठिकाणी येणारे सर्वच उपासकांसाठी एक पुनर्जन्मस्तगीत बाबासाहेबांनी दिलेली जगातील एकमेव अशी दीक्षा आहे. तथागत गौतम बुद्धांचा विचार या भारतभूमीमध्ये तेवत ठेवण्याचे काम विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेला आहे.***

***(आज सकाळपासून कामठी इथल्या ड्रॅगन पॅलेस टेम्पल इथं बौद्ध अनुयायांनी मोठी गर्दी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज ड्रॅगन पॅलेस टेम्पलला भेट देऊन तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचं दर्शन घेतलं. यावेळी माजी मंत्री सुलेखा कुंभारे यांच्या नेतृत्वात आयोजित सामूहिक बुद्ध वंदना कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले. भारतीय संविधानाच्या जगातील सर्वात मोठ्या आकाराच्या प्रतिकृतीची निर्मिती ड्रॅगन पॅलेस तर्फे करण्यात येत आहे. आज या प्रतिकृतीच्या संकल्पपत्राचं अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.*** **आकाशवाणी वृत्त विभागातून मी राम औरंगाबादकर)**

**संविधान सत्याग्रह पदयात्रा**

संविधान सत्याग्रह पदयात्रेचा आज सेवाग्राम इथं समारोप झाला. नागपूरच्या दीक्षाभूमी ते सेवाग्राम पर्यंत ही पदयात्रा होती. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, तुषार गांधी यांच्यासह अनेक नेते आणि मोठ्या संख्येनं कार्यकर्ते या पदयात्रेत सहभागी झाले होते. बापूंच्या स्मृतीना अभिवादन केल्यानंतर हर्षवर्धन सपकाळ यांनी, माध्यमांशी संवाद साधला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका करत, संघ विसर्जित करावा आणि गांधींच्या विचारांच्या अनुषंगानं, पुढची वाटचाल स्वीकारावी असं प्रतिपादन त्यांनी केलं.

**आठवले रिपब्लिकन पत्र परिषद**

बिहारच्या बुद्धगया इथल्या महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन, बौद्धांच्या हाती द्या या मागणीसाठी मुंबईत, येत्या १४ ऑक्टोबर रोजी, सर्वपक्षीय मोर्चाचं आयोजन, करण्यात येणार आहे अशी माहिती, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज, नागपूर इथं घेतलेल्या संयुक्त पत्र कार परिषदेत दिली. याप्रसंगी पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष प्रा.जोगेंद्र कवाडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य आणि, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, गवई गटाचे डॉ.राजेंद्र गवई, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, प्रकाश गजभिये तसंच, रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट उपस्थित होते. बोधगया विहार मुक्तीची ही मागणी, 1992 पासूनची असल्याचं, आठवले यांनी सांगितलं......

**(होल्ड बाईट -रामदास आठवले-३२ सेकंद)**

महाबोधी विहार संयुक्त समितीच्या आतापर्यंत मुंबईत तीन बैठका झाल्या असून, यामध्ये सर्वपक्षीय नेते, रिपब्लिकन गट त्याच प्रमाणे बौद्धांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय संघटना यांनी, एक मतानं, महाविहार मुक्ती आंदोलनासाठी, 14 ऑक्टोबरच्या मोर्चामध्ये, सर्व राजकीय भूमिका सोडून, एकत्र येण्याची मानसिकता ठरवली असल्याचं, जोगेंद्र कवाडे यांनी स्पष्ट केलं.

**'सेवा पर्व'**

केंद्र सरकार ईशान्येकडील राज्यांना मुख्य प्रवाहात आणत आहे, ही राज्यं आता देशाच्या विकासाचं एक नवीन इंजिन ठरत आहेत, 'सेवा पर्व' या विशेष मालिकेच्या आजच्या भागात याविषयी जाणून घेऊया.

***(होल्ड बाईट)***

***(वॉइस बाईट - नम्रता फलके)***

***("एकेकाळी सीमावर्ती भाग म्हणून पाहिला जाणारा ईशान्य भारत आता प्रगती, शांतता आणि अमर्याद क्षमतांचा प्रदेश ठरला आहे. गेल्या अकरा वर्षांत सरकारनं समावेशक विकासासाठी परिवर्तनकारी दृष्टीकोन अवलंबला आहे. यामुळं ईशान्येकडील प्रदेश अभूतपूर्व विकासाबरोबरच राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आपले स्थान अनुभवत आहे.)***

***(होल्ड बाइट - पंतप्रधान नरेंद्र मोदी 40 सेकंद)***

***स्वास्थ्य विकसित भारत के निर्माण के लिए पूर्वी भारत का विकसित होना बहुत जरूरी है और नॉर्थ ईस्ट पूर्वी भारत का सबसे अहम अंग है। हमारे लिए इसका मतलब सिर्फ एक दिशा नहीं है हमारे लिए ईस्ट का मतलब है एम्पावर एक्स स्ट्रेंगथन एंड ट्रांसफॉर्म. पूर्वी भारत के लिए यही हमारी सरकार की नीती है। यही पॉलिसी यही प्रायोरिटी आज पूर्वी भारत को हमारे नॉर्थ ईस्ट को ग्रोथ है के सेंटर स्टेज पर लेकर आई हैं।***

***(सरकारनं लुक ईस्ट धोरणाचं रूपांतर ऍक्ट ईस्ट आणि आता त्याही पुढे जात अ‍ॅक्ट फास्ट आणि अ‍ॅक्ट फर्स्ट असं केलं आहे. २०१४-१५ मध्ये, ईशान्य प्रदेश विकास मंत्रालयासाठीची तरतूद सुमारे २ हजार ३३३ कोटी रुपय एवढी होती, ती अडीच पटीनं वाढवून पाच हजार ९०० कोटी रुपये एवढी झाली आहे. एकेकाळी देशाच्या इतिहासात बाजूला पडलेला ईशान्येकडील प्रदेश आता देशाच्या विकासाचं इंजिन ठरत आहे.")***

**विजयादशमी**

विजयादशमी अर्थात दसऱ्याचा सण आज साजरा होत आहे. काल महानवमीच्या पूर्णाहुतीनंतर, नवरात्रोत्सवाची आज सांगता होत आहे. आज सरस्वती पूजन, शस्त्र पूजन तसंच वाहन पूजनही केलं जातं.

अधर्मावर धर्माचा विजय साजरा करण्यासाठी आज, रावण दहन करण्याची देखील प्रथा आहे. नागपूरच्या कस्तुरचंद पार्क मैदानावर आज संध्याकाळी रावण दहन होणार असून, त्यासाठी रावण, कुंभकर्ण आणि मेघनाद यांचे पुतळे उभारून परिसर सज्ज करण्यात आला आहे. शहरातील रेशीमबाग, सक्करदरा, राजाबक्षा यासह इतरही ठिकाणी रावण दहन केलं जातं. गोंदिया शहरात आज, विजयादशमी निमित्त 'श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान' यांच्यातर्फे 'दुर्गामाता दौड' आयोजित करण्यात आली. यावेळी शस्त्रांच्या प्रात्यक्षिकातून छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली.

*****